## नियमीत दिवाणी मुकदमा क्रमांक ३२/२०१७ मधील नि. २८ वरील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुत अर्ज दावा मिळकत क. गट नं. २१७९ एकूण क्षेत्र ००–१६–०० हे–आर या मिळकतीची तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीत बेकायदेशीररित्या बांधलेल्या दोन गोठ्यांची मोजणी करून त्याप्रमाणे स्थलनिर्देशन करून अहवालासह मोजणी नकाशा दाखल करण्यासाठी उपअधिक्षक भुमी अभिलेख लांजा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती होण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व वादपत्र यातील वादीचे कथनानुसार दावा मिळकत क. गट क्र. २१७९ वादी व प्रतिवादी क्र ३ ते६ यांच्या मालकी वहिवाटीची असून त्याच्याशी प्रतिवादी क्र. १ व २ चा कोणताही हक्कसंबंध नाही. दावा मिळकतीलगत प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या मालकीची क. गट क्र. २१६२ ही मिळकत आहे. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. १ व २ यांनी बेकायदेशीररित्या दावा मिळकतीत अतिक्रमण करून दोन गोठ्यांचे बांधकाम केले आहे. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीत केलेली गोठ्यांची बांधकामे निश्चित कोणत्या ठिकाणी आहेत व किती मापाची आहेत याबाबत वस्तुस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुत अर्ज.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला व अर्जातील कथने नाकारली. प्रतिवादीचे कथनानुसार, वादीची मिळकत फक्त दोन गुंठे असताना नाहक वेळकाढूपणा करण्यासाठी वादीने अर्ज दाखल केला आहे. वादी संपूर्ण मिळकतीचा मालक नसल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा असे प्रतिवादीचे कथन आहे.

४. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. वादी व प्रतिवादीचे सुविद्य वकील यांचा युक्तिवाद ऐकला.

५. अर्जातील व म्हणण्यातील परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील वादप्रश्न उपस्थित होतात. ते वादप्रश्न व त्यावरील कारण मिमांसेसहित निष्कर्ष खालील प्रमाणेः–

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १. | या दाव्याचे कामी उप–अधिक्षक भूमि अभिलेख लांजा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती होणे आवश्यक आहे का? | होकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करणेत येत आहेत. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्रमांक १ बाबतः</u>–**

६. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी हा दावा निरंतरचे व आज्ञार्थी ताकीदीसाठी व कब्जासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीत अतिक्रमण करून बेकायदेशीरपणे दोन गोठ्यांचे बांधकाम केले असल्याचे वादीचे कथन आहे. याउलट प्रतिवादी यांनी कैफियतीत कथन केले आहे की, त्यांनी नवीन गोठ्याचे बांधकाम दावा मिळकतीत केले नसून त्या मिळकतीत पूर्वापार गोठा आहे.

७. प्रस्तुत दाव्याचे कामी उद्भवलेल्या वादाचे स्वरुप पाहता दावा मिळकतीची मोजणी होऊन दावा मिळकतीच्या हद्दी निश्चित होणे आवश्यक आहे. तसेच दावा मिळकतीतील दोन गोठ्यांच्या बांधकामांची मोजमापे व त्यांचे निश्चित स्थान तसेच अतिक्रमण झाले असल्यास त्याचे क्षेत्र व निश्चित ठिकाण याबाबत वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे न्यायाचे दृष्टीने व मूळ वादप्रश्नाचे गुणदोषांवर योग्यरित्या निराकरण करण्याचे दृष्टीने आवश्यक आहे. तज्ञ न्यायालयीन आयुक्तांची नियुक्ती केल्याखेरीज सदर बाबी अभिलेखावर येऊ शकत नाहीत. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश २६ नियम ९ मधील तरतुदींनुसार न्यायालयीन आयुक्त म्हणून उप–अधीक्षक, भूमि अभिलेख, लांजा यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

८. सबब, वादी यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, वादप्रश्न क्र. २ करीता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. निशाण २८ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उप–अधीक्षक, भूमि अभिलेख, लांजा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. नियुक्त न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे भांबेड, ता. लांजा, जि. रत्नागिरी येथील दावा मिळकत क.गट क्र. २१७९ या मिळकतीला प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे कार्यालयातील मूळ अभिलेखा व नकाशा यांचे आधारे दावा मिळकतीची मोजणी करावी, त्याच्या हद्दी निश्चित करून प्रत्यक्ष जागेवर दाखवाव्यात. तसेच सदर मिळकतीत बांधलेल्या दोन गोठ्यांची मोजमापे घेऊन त्यांचे स्थान निश्चित करावे व सदर दोन गोठ्यांच्या

बांधकामामुळे अतिक्रमण झाले असल्यास त्या अतिक्रमणाचे ठिकाण व क्षेत्र निश्चित करावे.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी वर खंड क्र. २ मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करून स्थलनिर्देशनाच्या खुणा व मोजमापांसह नकाशासहीत स्पष्ट अहवाल तीन महिन्यांचे आत सादर करावा.

४. कोर्ट कमिशनचा होणारा खर्च वादी यांनी करायचा आहे व नियमानुसार होणारी मोजणी फी उप–अधीक्षक, भूमि अभिलेख, लांजा यांचे कार्यालयात त्वरित जमा करायची आहे.

५. वादी व प्रतिवादी यांनी सदर कमिशनकामी न्यायालयीन आयुक्त यांना सर्वतोपरी सहकार्य करणेचे आहे.

६. न्यायालयीन आयुक्त, उप–अधीक्षक, भूमि अभिलेख, लांजा यांना त्वरित कमिशनपत्र पाठविणेत यावे.

**दिनांक २०/०३/२०२१** **(गि. म. साधले.)**
**ठिकाण लांजा.** **दिवाणी न्यायाधीश क.स्त.लांजा,**
**जि.रत्नागिरी.**

*Case No : RCS No.32 of 2017*
*I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,*
*Court Name: Civil & Criminal Court, Lanja, Dist.Ratnagiri,*
*Date of decision : 20/03/2021*
*Order signed by P.O.on : 20/03/2021*
*Order uploaded on : 22/03/2021.*

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Girish Madhukar Sadhale
Date: 2021.03.22 18:29:30 +0530